# लाभली मनरेगाची साथ
# एक एकर शेतातून साधले समृद्धीचे ध्यास

| वैयक्तिक शेळीपालन व कुक्कुटपालन शेड | |
|---|---|
| लाभार्थी | **श्री. दसाराम टीकाराम कांबळे** |
| ठिकाण | जिल्हा – भंडारा, तालुका - भंडारा , ग्रामपंचायत - बासोरा |
| आर्थिक वर्ष | 2020-2021 |

एखाद्याने जर स्वतःचा विकास करण्याचे ठरविले तर त्याला कोणीही थांबू शकत नाही. फक्त गरज असते नितांत इच्छाशक्तीची, ज्याने मणी बाळगलेला ध्यास प्राप्ती करता येईल. महात्मा गांधी नरेगाच्या माध्यमातून कुटुंब समृद्ध करण्याचे शासनाचे उद्देश आहे. कुटुंब समृद्ध झाल्यास गाव समृद्ध होईल आणि गाव समृद्ध झाल्यास पर्यायाने महाराष्ट्र समृद्ध होईल या हेतूने ग्रामपंचायत स्तरावर मनरेगा अंतर्गत कुटुंबांना जास्तीतजास्त वैयक्तिक लाभाच्या कामांचा लाभ देऊन त्यांना समृद्ध करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहे. महात्मा गांधी नरेगा अंतर्गत विविध प्रकाराचे वैयक्तिक लाभाची कामे अनुज्ञेन आहेत ज्यामाध्येमातून अल्पभुधारक शेतकरी सुद्ध स्वताचा विकास करु शकतो. याचेच एक सुदर उदाहरण आहे भंडारा जिल्हयातील ग्रामपंचयात बासोरा या गावातील रहिवासी फक्त एक एकर शेतीधारक श्री. दसाराम टीकाराम कांबळे.

व्यवसायाने मजूर श्री. दसाराम टीकाराम कांबळे ज्यांच्याकडे फक्त एक एकर शेती आहे. त्यांना 3 मुले असून 1 मुलगा पायाने अपंग आहे. कुटुंबाचे उदरनिर्वाह करण्याची संपुर्ण जबाबदारी त्यांच्यावर असून मिळेल ते काम ते करत होते. या लार्भाथ्याला महात्मा गांधी नरेगाची साथ मिळाली आणि त्यांचे जीवन समृद्ध झाले.

सन 2013-14 मध्ये त्यांनी बचत गटाकडून रु. 10,000/- कर्ज घेऊन तीन शेळ्या विकत घेतल्या. या तीन शेळ्यातून पुढिल वर्षी त्यांच्याकडे 10 शेळ्या तयार झाले. ग्रामरोजगार सेवक यांनी त्यांच्याकडे असलेल्या शेळ्या हया घराबाहेर बांधत असल्यामुळे नरेगा योजनेतून आपणास शेळीपालन शेड मिळू शकता याबाबत माहिती दिली. त्यानुसार त्यांनी गावातील सरपंच व ग्रामसेवक यांच्याशी चर्चा केली असता जर आपणास शेळ्यांचा शेड हवा असेल तर पुढील होणारी ग्रामसभेच्या दिवशी आपण उपस्थित राहून नाव सामाविस्ट करावे व कामाची मागणी करावी कसे कळविले. त्यानुषंगाने त्यांनी ग्रामसभेत शेडीपालन शेड





मिळण्याकरीता मागणी केली. पंचायत समिती स्तरावरून आवश्यक ती कार्यवाही पुर्ण करून त्यांना मनरेगा शेडीपालन शेड मंजूर झाले. सदर काम करतांना त्यांना रोजगार ही मिळाला व स्वतासाठी शेड देखील तयार करण्यात आले. रोजगारासह साहित्यसाठी लागणारे कुशल खर्च तातडीने मिळाल्याने कार्यपुर्ण करण्यास प्रोत्साहन मिळाली.

महात्मा गांधी नरेगा अंतर्गत शेडीपालन शेड मिळाल्याने शेडीपालन व्यवसायास चालना मिळाली. पूर्वी त्यांच्याकडील शेळ्या ह्या घराबाहेर बांधावे लागत असे. त्याना थंडी, वारा, ऊन, पाऊस यांचा सामना करावा लागत असे. शेळ्यांवर नैर्सगिक रोगराई येत असल्यामुळे काही शेळ्या मृत पावत असे परंतु शेळीपालन शेड मिळाल्यानंतर थंडी, वारा, ऊन पाऊस व रोगराई पासून संरक्षण मिळाले व आरोग्यात सुद्धा सुधारणा झाली. आधी मोकळ्या जागेत लेंडी खत कमी प्रमाणात तयार होत होते, परंतु आता शेडमुळे पर्याप्त प्रमाणात लेंडी खत तयार झाले व त्यातून आर्थिक उत्पन्न वाढले. श्री. कांबळे यांना शेळीपालनातून वर्ष निहाय झालेल्या प्रगतीचा आलेख पुढिलप्रमाणे आहे. सुरुवातीला 10 शेळ्यापासून प्रारंभ करण्यात आलेला शेडीपालन व्यवसाय कालांतराने वाढत गेला.

| आर्थिक वर्ष | एकुण शेळ्यांची विक्री | विक्रीतून प्राप्त उत्पन्न | लेंडी खत विक्रीतून प्राप्त उत्पन्न | एकुण उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| **2016-17** | 12 शेळ्या | रु. 72,000/- | रु. 3,000/- | **रु. 75,000/-** |
| **2017-18** | 25 शेळ्या | रु. 1,50,000/- | रु. 6,000/- | **रु. 1,56,000/-** |
| **2018-19** | 85 शेळ्या | रु. 3,00,000/- | रु. 10,000/- | **रु. 3,10,000/-** |
| **2019-20** **(साथीरोग मुळे शेळ्या मतृ पावल्या)** | 78 शेळ्या | रु. 2,40,000/- | रु. 10,000/- | **रु. 2,50,000/-** |

लाभार्थ्याला मनरेगा योजने अंतर्गत रु. 69,873/- चा 6 X 6 मी. आकाराचा शेळीपालन शेड देण्यात आला. परंतु शेळ्यांच्या वाढत व्याप्त पाहता शेळ्यांसाठी मोठ्या निवाराची आवश्यकता भासू लागली. तसेच शेळ्यांची संख्या वाढल्याने काही शेळ्या पुन्हा पूर्वी प्रमाणे घराबाहेर बांधावी लागत होते. त्याच काळात त्यांना रोगराई व ईतर समस्या यांना तोंड दयावे लागले. अचानक आलेल्या साथीच्या रोगामुळे जवळपास 45 शेळ्या मृत पावल्या व त्यामुळे त्यांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागला. तथापि, या संकटामुळे निराश न होता यापूर्वी शेळी व्यवसायातून झालेला फायदा लक्ष्यात घेत त्यांनी पुन्हा भरारी घेण्याचा चंग बांधला. त्यानुसार त्यांनी त्यांच्या शेतावर मोठ्या स्वरूपाचे शेळी शेड व कुकूटपालन शेड घेण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी विजया बँक शाखा भंडारा मार्फत दोन लाखाचे मुद्रा लोन घेतले व यापूर्वी शेळीपालन उत्पन्नामधून मिळालेली रक्कम (बचत केलेली) दोन लाख रुपये अशी एकुण चार लाख रुपयाचे (24 X 9 मी.) या आकारमानाचे शेड तयार करण्यात आले. या शेडमध्ये मनरेगा अंतर्गत आर्थिक वर्ष 2020-21 पासून शेळीपालनासह कुक्कुटपालन देखील घेण्यात आले.

❖ आर्थिक वर्ष 2020-21 आणि 2021-22 मध्ये शेडीपालन व कुक्कुटपालनातून प्राप्त झालेला नफा





| शेडीपालन व कुक्कुटपालन | |
|---|---|
| **आर्थिक वर्ष 2020-21** | |
| **शेडीपालन** | |
| **एकुण शेळ्यांची विक्री** | 70 शेळ्या |
| **विक्रीतून प्राप्त उत्पन्न** | रु. 4,20,000/- |
| **लेंडी खत विक्रीतून प्राप्त उत्पन्न** | रु. 20,000/- |
| **एकुण उत्पन्न** | **रु. 4,40,000/-** |
| **कुक्कुटपालन** | |
| **एकुण कोंबडी विक्री** | 80 कोंबडी |
| **अंडी विक्रीतून उत्पन्न** | रु. 24,000/- |

| शेडीपालन व कुक्कुटपालन | |
|---|---|
| **आर्थिक वर्ष 2021-22** | |
| **शेडीपालन** | |
| **एकुण शेळ्यांची विक्री** | 50 शेळ्या |
| **विक्रीतून प्राप्त उत्पन्न** | रु. 3,00,000/- |
| **लेंडी खत विक्रीतून प्राप्त उत्पन्न** | रु. 20,000/- |
| **एकुण उत्पन्न** | **रु. 3,20,000/-** |
| **कुक्कुटपालन** | |
| **एकुण कोंबडी विक्री** | 70 कोंबडी |
| **अंडी विक्रीतून उत्पन्न** | रु. 42,000/- |

| | |
|---|---|
| **लेंडी खत विक्रीतून प्राप्त उत्पन्न** | रु. 5,000/- |
| **एकुण उत्पन्न** | **रु. 29,000/-** |
| **एकुण नफा – रु. 4,39,000/-** | |

| | |
|---|---|
| **लेंडी खत विक्रीतून प्राप्त उत्पन्न** | रु. 5,600/- |
| **एकुण उत्पन्न** | **रु. 47,600/-** |
| **एकुण नफा – रु. 3,67,600/-** | |

| आर्थिक वर्ष 2022-23 मध्ये वर्षाशेवटी पर्यंत उत्पन्नाचे अंदाजित अनुमान | | | |
|---|---|---|---|
| शेडीपालन | | कुक्कुटपालन | |
| एकुण शेळ्यांची विक्री | 70 शेळ्या | एकुण कोंबडी विक्री | 300 कोंबडी |
| विक्रीतून प्राप्त उत्पन्न | रु. 4,20,000/- | अंडी विक्रीतून उत्पन्न | रु. 1,50,000/- |
| लेंडी खत विक्रीतून प्राप्त उत्पन्न | रु. 20,000/- | लेंडी खत विक्रीतून प्राप्त उत्पन्न | रु. 5,000/- |
| एकुण उत्पन्न | **रु. 4,40,000/-** | एकुण उत्पन्न | **रु. 1,55,000/-** |
| एकुण अंदाजित नफा – रु. 5,95,000/- | | | |

काबंळे कुटुंबाला शेडीपालन व कुक्कुटपालनासाठी सन 2016-17 पासून ते आतपर्यंत अंदाजित रु. 3,20,000/- इतके खर्च झाले असून या व्यवसायातून त्यांना आतापर्यंत सरासरी रु. 16,25,000/- उत्पन्न मिळाले आहे. शेळी व कुक्कुटपालन याच्या उत्पन्नातून रु. 13,15,000/- इतका निव्वळ नफा झाला असून यामाध्येमातून त्यांनी आर्थिक प्रगती केलीली आहे. शासनाच्या कल्यानकारी योजनांचा संयुक्त फायदा येते श्री. दसाराम कांबळे यांनी आपले स्वप्नपूर्ती केली आहे. त्यांनी मागील सात वर्षात कुटुंबाच्या गरजेनुसार कुटुंब समृद्ध होणाच्या दृष्टीने स्वताचे घर बांधले, मुलाचे लग्न लावून दिले, सोने खरेदी, बाईक खरेदी अश्या अनेक उपयोगी वस्तू गरजेनुसार घेतले आहे.





श्री. कांबळे यांच्याकडे असलेल्या एक एकर शेतात खरीप हंगामात धान पीक व रब्बी हंगामात गहू पीक घेत आहेत. सदर उत्पादनातून तांदूळ व गहू हे कुटुंबाकरिता उपयोगात आणण्यात येत व उन्हाळ्यात चारापिके याचे उत्पादन घेतात ज्यामुळे जनावरांसाठी चाऱ्याची सोय होते.

❖ **लार्भाथ्याचे मनोगत**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना माझ्यासाठी एक वरदान ठरली आहे. मनरेगा अंतर्गत मला मिळालेले शेळीपालन शेड मुळे माझ्या शेळीपालन व्यवसायाला चालना मिळाली व लाभातून माझे जीवन समृद्ध झाले. मनरेगा योजनेतून मिळणाऱ्या विविध वैयक्तिक लाभाच्या कामांचा शेतकरी लाभ घ्यावा आणि समृद्ध व्हावे हि अपेक्षा. शेती व शेती पूरक व्यवसायातून आपण लखपती होऊ शकतो हे मी स्वत: अनुभवले असून इतर शेतकऱ्यांनी लाभ घेवून समृद्ध व्हावे.

